महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०८ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

✻ मराठी भाषादिन.

✻ चंद्रशेखर आझाद यांनी अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडता झाडता शेवटी स्वत:वरच गोळी झाडली व मृत्यूला कवटाळले.

१९१२ : मराठीतील ज्येष्ठ कवी व नाटककार वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८२,२४८.६१ | -२७.४६ (०.०३३%) |
| डॉलर | ₹ ९०.९५ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३४ | १९ |
| दिल्ली | ३१ | १५ |
| मुंबई | ३१ | २१ |
| नागपूर | ३३ | १८ |
| पुणे | ३३ | १३ |

# देशात साखर उत्पादनात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर; उत्तर प्रदेश, कर्नाटक पिछाडीवर

वृत्तसंस्था । पुणे

**देशात साखर उत्पादनात उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्र चालू हंगामात पहिला क्रमांक पटकावणार आहे. या हंगामात देशातील एकूण साखर उत्पादन ३२४ लाख टन असेल आणि त्यात महाराष्ट्राचा वाटा ११८ लाख टन तर उत्तर प्रदेशचा वाटा ९८.५ लाख टन असेल, असा अंदाज इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (इस्मा) बुधवारी वर्तविला.**



'इस्मा'च्या कार्यकारी समितीची बैठक पुण्यात झाली. या बैठकीनंतर देशातील साखर उत्पादनाचा चालू हंगामातील तिसरा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला. या महिन्याच्या सुरुवातीला उपग्रहांद्वारे घेतलेल्या छायाचित्रांचे मूल्यमापन करून हा अंदाज मांडण्यात आला आहे. त्यात आतापर्यंत तोडणी झालेल्या उसाचे क्षेत्र, तोडणी राहिलेले क्षेत्र यांचा विचार करण्यात आला आहे. तसेच, उसाचे उत्पादन, साखरेचा उतारा या गोष्टींचाही विचार यात करण्यात आला आहे.

'इस्मा'च्या अंदाजानुसार, देशात या हंगामात साखर उत्पादन ३२४ लाख टन राहील. त्यातील ३१ लाख टन साखर इथेनॉल उत्पादनासाठी वळविण्यात येईल. यामुळे निव्वळ साखर उत्पादन २९३ लाख टन असेल. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पादन १२ टक्के जास्त असेल. आधीच्या अंदाजात देशात साखर उत्पादनात उत्तर प्रदेश आघाडीवर राहील, असे चित्र मांडण्यात आले होते. नवीन अंदाजात (पान २ वर)

### ➤ अतिरिक्त साठा ५३ लाख टन

**'चालू हंगाम सुरू होताना ऑक्टोबर २०२५ मध्ये देशातील साखरेचा अतिरिक्त साठा ५० लाख टन होता. यंदाच्या हंगामात उत्पादन, इथेनॉल निर्मितीसाठी वळविण्यात येणारे उत्पादन आणि शिल्लक धरून देशातील साखरेचा एकूण साठा ३४३ टन होणार आहे. देशांतर्गत साखरेची मागणी २८३ लाख टन असून, ७ लाख टन साखरेची निर्यात होणार आहे. त्यामुळे चालू हंगाम संपताना सप्टेंबरअखेरीस साखरेचा अतिरिक्त साठा ५३ लाख टन असेल', असे 'इस्मा'ने म्हटले आहे.**

**सुविचार**

जगण्याची कला म्हणजे स्वत:ला सापडणे आणि स्वत:च्या अस्तित्वाचा उत्सव साजरा करणे.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:५० | संध्या-६:३१ |

**सोने - चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,६२,६०५/- | २,८५,०००/- |

**केळी भाव**

| | |
|---|---|
| नवती | १३५५ ते १३६० |
| पिल बाग | ११०१ ते ११०२ |
| कांदे बाग | ---- |

# राज्यात सक्तीची फक्त 'मराठीच'

## मुख्यमंत्री फडणवीसांचं हिंदी भाषा सक्तीबाबत विधानसभेत मोठं वक्तव्य

वृत्तसंस्था । मुंबई

**गेल्या काही महिन्यांपासून राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती करण्याच्या निर्णयावरून वाद सुरु आहे. केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक आराखड्यातील तरतुदींचा आधार घेत राज्यातील महायुती सरकारने १७ जून रोजी त्रिभाषा सूत्राचा शासन निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार राज्यातील मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांना इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवावी लागणार होती. मात्र, त्या निर्णयाला राज्यभरातून तीव्र विरोध झाल्यानंतर राज्य सरकारने तो मागे घेतला होता.**



त्यानंतर राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या संदर्भात एका समितीची स्थापना केली होती. या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील भूमिका ठरवली जाणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं होतं. दरम्यान, या हिंदी भाषा सक्तीच्या मुद्यांवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत बोलताना पुन्हा एकदा मोठं भाष्य केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषा सक्तीच्या मुद्यांवरून उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. तसेच शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीची केली जाणार का? या मुद्यांवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महत्वाचं भाष्य केलं. 'आमच्या राज्यात सक्तीची फक्त मराठीच असेल', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत बोलताना म्हटलं आहे.

'मुख्यमंत्री असताना मंत्र्यांचं काहीही अस्तित्व नसतं, म्हणजे इंग्रजी, हिंदी दुसरी भाषा पहिलीपासून लागू करावी, असा अहवाल हा उद्धव ठाकरे यांच्या काळातील आहे.

तेव्हाच्या मंत्रिमंडळाने काय स्वीकारलं? तर इंग्रजी, हिंदी दुसरी भाषा म्हणून पहिलीपासून ते १२ वी पर्यंत सक्तीची करण्यात यावी, ही शिफारसी उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने स्वीकारली होती', असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### ➤ भाषा सक्तीबाबत मुख्यमंत्री ठाम...

**'त्यानंतर आमचं सरकार आलं आणि आमच्या अधिकाऱ्यांनी १ ते १२ वीपर्यंत सक्ती, असा निर्णय कुठेही घेतला नाही. पण या अहवालाचा आधार घेऊन त्रिभाषा सूत्राचा जीआर काढला. त्यानंतर आमच्यावर मोठी टीका झाली. मला तर कधी-कधी आश्चर्य वाटतं. बर एवढंच नाही तर आमचे राज ठाकरे हे देखील त्यांच्याबरोबर (उद्धव ठाकरेंबरोबर) गेले. पण माझ्यामुळे दोन भाऊ एकत्रित आले याचा मला आनंद आहे. आता भाषा सक्तीबाबत पुन्हा एकदा सांगतो, आमच्या राज्यात सक्तीची फक्त मराठीच', असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.**

### ➤ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

**हिंदी भाषा सक्तीच्या मुद्यांवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, '१४ सप्टेंबर २०२१ रोजी यासंदर्भातील अहवाल सादर झाल्यानंतर तो अहवाल २० जानेवारी २०२२ रोजी मंत्रिमंडळासमोर आला. आता त्या अहवालाचं इतिवृत्त मी याठिकाणी घेऊन आलो आहे. डॉ.माशेलकर समितीच्या प्रस्तावित शिफारसींना मान्यता आणि त्या अहवालावर स्वाक्षरी कोणाची? ही स्वाक्षरी कोणाची हे फक्त आदित्य ठाकरे सांगतील,' असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.**

# सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड



वृत्तसंस्था । मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक रचनेत मोठी फेरबदल करण्यात आली असून सुनेत्रा पवार यांच्याकडे आता राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक बदल झाले आहेत.**

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (एनसीपी) अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अजित पवारांकडे उपमुख्यमंत्री पदासह पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही होते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची या पदावर नियुक्ती होणे निश्चित मानले जात होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज वरळी डोम येथील सभागृहात पार पडली. यावेळी राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी हात उंचावून पाठिंबा दिला. यानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्याचे प्रफुल पटेल यांनी जाहीर केले. प्रफुल पटेल यांनी यावेळी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवार यांच्या नेतृत्वाविषयी (पान २ वर)

अजित पवार यांच्या पश्चात पक्षाच्या अध्यक्षपदी कोणाची निवड होणार याची उत्सुकता होती. मध्यंतरी प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची चर्चा होती, पण त्यांनी या चर्चांना फेटाळून लावले. सर्व कायेदशीर प्रक्रिया पूर्ण करूनच निवड केली जाईल, असे पटेल यांनी स्पष्ट केले होते. सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी सर्व नेतेमंडळी ठाम उभी राहणार असून, पक्ष बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले होते.

## थोडक्यात

### फायनलमध्ये केएल राहुलचा फ्लॉप शो

**मुंबई ।** जम्मू-काश्मीर संघाने पहिल्यांदाच या स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तसेच हा सामना जिंकण्यासाठी जम्मू-काश्मीर संघ मजबूत स्थितीत आहे. पहिल्या डावात फलंदाजी करताना जम्मू-काश्मीर संघाने ५८४ धावांचा डोंगर उभारला आहे. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कर्नाटक संघाला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले आहेत.

# आठवीच्या पुस्तकात न्यायालयातील भ्रष्टाचारासंबंधी धडा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग अर्थात एनसीईआरटीने प्रकाशित केलेल्या इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून वाद निर्माण झाला आहे.**

**सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमात न्यायव्यवस्थेशी निगडीत भ्रष्टाचाराच्या प्रकरणाचा समावेश करण्यावर पंतप्रधानांनी आक्षेप घेतला आहे. तसेच त्यांनी याची विषयाची योग्यता आणि याला मंजूरी देण्याची प्रक्रिया या दोन्हीवर प्रश्न उपस्थित केले. आपण आठवीत शिकणाऱ्या मुलांना न्यायालयीन भ्रष्टाचाराबद्दल काय शिकवत आहोत? असा सवाल पंतप्रधान मोदी यांनी बैठकीदरम्यान उपस्थित केला असे सूत्रांनी सांगितले.**

या पुस्तकात 'समाजातील न्यायपालिकेची भूमिका' या धड्याचा समावेश करण्यात आला असून यामध्ये 'न्यायपालिकेतील भ्रष्टाचार' या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणाची आता पंतप्रधान मोदी यांनी देखील दखल घेतली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नरेंद्र मोदी यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली.

तसेच पंतप्रधानांनी देखरेखीकडे झालेल्या दुर्लक्षाबद्दलही चिंता व्यक्त केली. असा मजकूर शालेय वर्गांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्याची देखरेख आणि मंजूरीचे काम कोण करत होते, असा सवाल त्यांनी केला.याबरोबरच शिक्षणाच्या इतक्या सुरुवातीच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना असे संवेदनशील संस्थात्मक समस्या शिकवल्या जात असल्याबद्दल त्यांच्या वक्तव्यातून (पान २ वर)

# इस्रायलच्या संसदेत मोदींचे भाषण

वृत्तसंस्था । जेरुसलेम

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या इस्रायलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी मोदी यांनी इस्रायलचे सर्वोच्च कायदेमंडळ असलेल्या 'क्नेसेट'मध्ये भाषण केले. मात्र मोदींच्या क्नेसेट भेटीवेळी इस्रायलमधील विरोधी पक्षांचे नेते हे सभागृहातून बाहेर जाताना पाहायला मिळाले. यावरून वेगवेगळ्या चर्चा होत आहेत. मोदी भाषणाला उभे राहिल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केल्याचा केला जात आहे.

# मालेगावात बनावट नोटांचा छापखाना उद्ध्वस्त

## संभाजीनगरच्या 'मास्टरमाइंड'ला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

वृत्तसंस्था । मालेगाव

**मालेगाव शहरासह परिसरात पाचशे रुपयांच्या बनावट नोटा चलनात आणणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्याची मोठी कारवाई नाशिक जिल्हा ग्रामीण पोलिसांनी केली आहे. या कारवाईत पोलिसांनी बनावट नोटा तयार करणाऱ्या संभाजीनगर येथील ङ्गमास्टरमाइंडफ्ला मध्यस्थ व साथीदारांसह बेड्या ठोकल्या आहेत. संशयीताच्या ताब्यातून नोटा छापण्यासाठी लागणारे आधुनिक साहित्य, बनावट नोटा असा मुद्देमाल जप्त**



**करण्यात आला आहे.**

या प्रकरणाची सुरुवात गेल्या २३ जानेवारी २०२६ रोजी झाली. मालेगावच्या सटाणा नाका परिसरातील एचडीएफसी बँकेत महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्स कंपनीचा कलेक्शन एजंट गणेश खरे हा भरणा करण्यासाठी गेला होता. यावेळी त्याने बँकेत ८९ हजारांचा भरणा केला. तेव्हा बँकेचे असिस्टंट मॅनेजर मोहन मुसळे यांना भरणा केलेल्या एकूण रकमेपैकी ५०० रुपयांच्या १०० नोटा (म्हणजे एकूण ५० हजार रुपये) बनावट असल्याचा संशय आला. या प्रकरणी मुसळे यांनी छावणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

**संभाजीनगरपर्यंत साखळी**

पोलिसांनी एजंट गणेश खरे यास संशयावरून ताब्यात घेतले आणि चौकशी सुरू केली. तेव्हा नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील शेतकरी रायभान जाधव यांचा ट्रॅक्टर (पान २ वर)

# जालना रेल्वे मार्गासाठी जळगाव जिल्ह्यातील २१०.८५ हेक्टर शेतजमिनीच्या संपादनास गती

## ● मराठवाडा ते उत्तर महाराष्ट्र रेल्वे मार्गाला होईल सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला कमी अंतरात थेट जोडणाऱ्या जळगाव-जालना या प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या कामांना आता गती मिळू लागली आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी लागणाऱ्या शेतजमिनींच्या संपादनासह प्रत्यक्ष मोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील जळगाव व जामनेर तालुक्यातील २१० .८५ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. यासाठी शेतजमीन संपादनाच्या प्रकल्पाला गती आली आहे.**

जळगाव ते जालना दरम्यान प्रस्तावित रेल्वे मार्गाची एकूण लांबी सुमारे १७४ किलोमीटर इतकी आहे. यापैकी जवळपास १४० किलोमीटरचा भाग जालना जिल्ह्यातून जाणार आहे, तर उर्वरित ३४ किलोमीटरचा मार्ग जळगाव जिल्ह्यातून प्रस्तावित आहे. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांमध्ये थेट रेल्वे संपर्क निर्माण होणार आहे. सध्या मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र यादरम्यान रेल्वेने प्रवास करताना मोठा वळसा घ्यावा लागतो, ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाढतात.

मात्र, नवीन मार्ग पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होणार असून, तो अधिक सुलभ आणि किफायतशीर ठरण्याची



अपेक्षा आहे. यासोबतच या रेल्वे मार्गामुळे माल वाहतुकीलाही मोठी चालना (पान २ वर)

# विरोधी पक्ष हा गोंधळलेल्या अवस्थेत देवेंद्र फडणवीस यांची टीका

वृत्तसंस्था । मुंबई

**दावोसमध्ये भारतीय कंपन्यांसोबत सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यावरून झालेल्या टीकेचे खंडन करत, आर्थिक जगात प्रासंगिक राहण्यासाठी उपस्थिती आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच विरोधी पक्ष हे गोंधळलेले आहेत, असे म्हणत विरोधकांवर टीका केली. विधिमंडळात राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेवेळी**



**फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील विविध मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली.**

फडणवीस यांनी म्हटले की, सरकारच्या विकसित महाराष्ट्र दस्तऐवजात पुढील चार ते पाच वर्षांत राज्याला (पान २ वर)

## संपादकीय

### वाढती असहिष्णुता

राजकीय पक्षांमध्ये असलेले वादविवाद किंवा मतभेद आता सगळीकडेच हाणामारीच्या पातळीवर परावर्तित होत आहेत, हे वाढत्या असहिष्णुतेचे प्रतीक असून त्याला वेळीच पायबंद घातला नाही, तर सगळाच सामाजिक तोल बिघडू शकतो. कायदा सुव्यवस्थेचाही गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे हाणामारीच्या पातळीवर आलेली ही राजकीय शत्रुता सर्वच राजकीय पक्षांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. या संदर्भात राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात अनेक असे प्रसंग घडलेले आहेत. त्या प्रत्येक घटनांची आपण येथे चर्चा करणार नाही, तर केवळ पुणे शहरात अलीकडच्या काळात ज्या घटना घडल्या त्या अनुषंगानेच आपण येथे परामर्श घेणार आहोत. पुणे शहराचा सांस्कृतिक लौकिक येथे नव्याने प्रतिपादित करण्याची गरज नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून पुण्यात विविध विचारसरणीच्या राजकीय संघटनांची आणि कार्यकर्त्यांची संख्या कायमच मोठी राहिली आहे. या सर्व राजकीय पक्षांनी आतापर्यंत आपापले राजकीय विचार जोपासताना आपले मुद्दे जनतेपुढे मांडले किंवा विरोधी विचारसरणीच्या लोकांनाही ते ऐकवले; पण त्यातून कधी गुद्दागुद्दी झाल्याचे पहायला मिळत नव्हते. 'विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे' हे जे वाक्य सातत्याने पूर्वी ऐकवले जायचे ते वाक्य पुण्यातले वेगवेगळ्या विचारसरणीचे राजकीय कार्यकर्ते शब्दशः पाळत असत. पण राजकारणातला हा समतोल आणि सहिष्णुता आता जवळपास लयाला गेल्यासारखी परिस्थिती दिसते आहे. काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंत पवार यांना राजकीय द्वेषातून मारहाण करण्याचा प्रकार घडला, एवढेच नव्हे तर त्यांना पिस्तूल दाखवून धमकावण्यात आले. आमच्या पक्षाच्या विरोधात का बोलतो, हा त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या भाजप समर्थक कार्यकर्त्यांचा त्यांना प्रश्न होता. एखाद्या राजकीय पक्षाच्या विरोधात दुसऱ्या राजकीय पक्षाच्या प्रवक्त्याने काही मतप्रदर्शन करणे याला खरं म्हणजे विरोध असण्याचे कारण नाही. हे मतप्रदर्शन संसदीय भाषेच्या चौकटीत असले पाहिजे ही प्राथमिक अट पाळली जाणे आवश्यक आहे. हनुमंत पवार यांनी चॅनलवरील चर्चेत संसदीय भाषेत भाजप समर्थकांचा प्रतिवाद केल्यानंतर त्यांना थेट पिस्तूलचा धाक दाखवून जीवघेणी मारहाण होईल आणि हा प्रकार मध्य पुण्यात घडेल याची कल्पनाही कोणी केली नसावी. याच पुण्यात काही दिवसांपूर्वी राजकीय द्वेषातून काँग्रेस भवनसमोर काँग्रेस व भाजपचे समर्थक भिडलेले पाहायला मिळाले. यावेळी दगडफेकही झाली. या दगडफेकीत काँग्रेसचे काही कार्यकर्ते आणि पत्रकारही जखमी झाले होते. हा प्रकारसुद्धा अवाक् करणारा ठरला होता. काँग्रेस भवनवर हल्ला करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांच्या जमावामध्ये पुण्याच्या नवनिर्वाचित महापौर आणि भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्षांचाही सहभाग होता, त्यांच्या समक्ष हा गंभीर प्रकार घडल्याने या प्रकाराचे गांभीर्य खूपच वाढते. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांचे एक विधान रुचले नाही आणि त्याचा निषेध करण्यासाठी हे कार्यकर्ते थेट काँग्रेस भवनांवर चालून गेले. एखाद्या राजकीय पक्षाच्या कार्यालयावर चालून जात तेथे दगडफेक करून दहशत माजवण्याचा प्रकार पुणे शहरात यापूर्वी क्वचितच घडला आहे. पुणे हे साहित्य संमेलने आणि साहित्यविषयक परिसंवादाचे शहर आहे, या शहरात विविध राजकीय पक्षांमध्ये एकोपा दर्शवणारे अनेक कार्यक्रम वर्षभर सातत्याने होत असतात.

# सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करा : जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

## बैठकीत विविध विभागांतील प्रलंबित विषयांचा घेतला आढावा

प्रतिनिधी । धुळे



**सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य देत सर्व प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात विविध विभागांतील प्रलंबित विषयांच्या आढावा बैठकीचे बुधवारी दुपारी आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते बोलत होत्या.**

या बैठकीस महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उपजिल्हाधिकारी (प्रशासन) संदीप पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी महादेव खेडकर, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर, शरद मंडलिक, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता जयश्री सार्वे, तहसीलदार अरुण शेवाळे, अपर तहसीलदार वैशाली हिंगे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी विविध प्रशासकीय विभागांतील प्रलंबित विषयांचा सविस्तर आढावा घेतला. यात अमरावती धरणातून विखरण पाझर तलावात पाणी सोडण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. शिंदखेडा येथे पशुसंवर्धन विभागासाठी योग्य जागेचा शोध घेऊन प्रस्ताव सादर करावा. अक्कलपाडा येथील वाढीव भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी. नगावबारी, धुळे येथील अतिक्रमणधारकांना पात्रतेनुसार नियमानुकूल करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत प्रस्ताव सादर करून पात्र लाभार्थ्यांना भूखंड उपलब्ध करून द्यावेत.

भूमी अभिलेख विभागाने मंजुरीनंतर प्रॉपर्टी कार्ड तयार करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. शहरातील मौजे धुळे गट क्रमांक ११३ येथील अतिक्रमण निष्कासितांच्या पुनर्वसनाचे नियोजन करावे. महसूल विभागातील ई-क्यूजी कोर्ट प्रणालीअंतर्गत प्रलंबित सुनावण्या तत्काळ घ्याव्यात. सर्कल व तलाठी कार्यालयांसह सर्व कार्यालयांमध्ये ई-ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर करावा. जिल्ह्यातील सर्व कार्यालयांना आयएसओ मानांकन मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. महसूल विभागातील आर.आर.सी. वसुलीची गती वाढवावी.

पुरवठा विभागाने नागरिकांना नियमित रेशन उपलब्ध करून द्यावे. चारही तालुक्यातील रास्त धान्य दुकाने यांची वेळोवेळी तपासणी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असेही निर्देश त्यांनी दिले, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## नशिराबादमध्ये संत गाडगेबाबा यांना अभिवादन

प्रतिनिधी । नशिराबाद

समाजप्रबोधन, स्वच्छता आणि मानवतेचा संदेश देणारे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त नशिराबाद परीट समाजातर्फे संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. धीरज सैतवाल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर प्रस्ताविक चेतन सपकाळे यांनी आपले विचार मांडले आणि आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमास किशोर पाटील, लालचंद पाटील, पंकज महाजन यांनी संत गाडगेबाबांच्या कार्याचा गौरव करत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सुरेश ठाकरे, योगेश पाटील, लालचंद पाटील, सुदाम धोबी व कैलास नेरकर, किशोर पाटील, पंकज महाजन, वित्त व नियोजन सभापती मनोज पाटील, आरोग्य व स्वच्छता सभापती चेतन बऱ्हाटे, सामाजिक कार्यकर्ता विनोद रंधे, नगरसेवक विकास धनगर, निलेश पिंगळे, सचिन हिंगणे, निलेश खुंटे, राजेश कोष्टी, आदी उपस्थित होते.

## शॉर्ट न्यूज कॅम्पस इंटरव्ह्यूत २९ विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी । दोंडाईचा

येथील स्वो. वि. संस्थेचे दादासाहेब रावल महाविद्यालय येथे सन फार्मा इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीतर्फे कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. त्यात २९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेसाठी कंपनीचे जनरल मॅनेजर भोजेसिंग गिरासे व एच. आर. कुंदन गुप्ता यांनी विद्यार्थ्यांची बहुविकल्पीय प्रश्नांवर आधारित लेखी परीक्षा घेतली. परीक्षेस ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी ३५ विद्यार्थी लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन पुढील मौखिक फेरीसाठी पात्र ठरले. अंतिम टप्प्यात २९ विद्यार्थ्यांची निवड निश्चित करण्यात आली.

## पारोळ्याच्या नेमबाजांनी विभागीय खुल्या रायफल शूटिंग स्पर्धेत पदकांची केली लयलूट

प्रतिनिधी । पारोळा



मुंबई येथे पार पडलेल्या 'विभागीय खुल्या रायफल शूटिंग स्पर्धेत' येथील लक्षसिद्धी रायफल शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी सुवर्ण व रौप्य पदकांची लयलूट करत अकॅडमीचा डंका वाजविला. येथील योगेश चौधरी याने सीनियर १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक तसेच एनसीसी ग्रुपिंगमध्येही सुवर्णपदक पटकावले. विवेक पाटील याने सीनियर गटात सुवर्णपदक. तर नैतिक जैन याने ज्युनिअर आणि सीनियर अशा दोन्ही गटांत प्रत्येकी एक सुवर्णपदक मिळवत दुहेरी यश संपादन. हेमकांत चव्हाण याने सब-ज्युनिअर गटात रौप्यपदक. सोहम बागुल ज्युनिअर गटात रौप्यपदक पटकावले. या दैदिप्यमान यशामागे खेळाडूंचा कठोर सराव, शिस्तबद्ध तयारी आणि राष्ट्रीय पातळीवरील अद्ययावत साधनसामग्री उपलब्ध करून देणारे अशोक विसपुते यांचे योगदान मोलाचे ठरले. मुख्य प्रशिक्षक रोहित मिनल ( कोच) यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी कसून सराव करत स्पर्धेत आपली छाप पाडली.

## गणित स्पर्धा परीक्षेत एकलव्य विद्यालयाचे यश

प्रतिनिधी । नंदुरबार

**महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळ आयोजित गणित स्पर्धा परीक्षेत एकलव्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. त्यामुळे विद्यालय पुन्हा जिल्ह्यात अव्वल ठरले आहे. इयत्ता पाचवीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांपैकी सर्वाधिक विद्यार्थी एकलव्य विद्यालयाचे उत्तीर्ण झाले असून ते राज्यस्तरीय परीक्षेसाठी पात्र ठरलेले आहेत.**

इयत्ता पाचवीतून आरव गौरीशंकर धुमाळ, जिया फातेमा अन्सार शेख, यशोदीप मच्छिंद्र पाटील, आरुष संजय बैरागी, हर्षदा सुनील सूर्यवंशी, सार्थकी गणेश सांगळे, जिग्नेश संतोष एकलारे, गुंजन रवींद्र राजपूत, जान्हवी विशाल बारी, दिवेश प्रेमचंद पाटील व स्वरांगी यशवंत कोकणे या विद्यार्थ्यांनी यश मिळविले तर इयत्ता आठवीतून हर्षल अमरसिंग पवार, आदर्श राहुल पाटील, मयंक दिनेश जाधव, साई सुनील माळी, जिग्नेश भानुदास भामरे व देवांशू नितीनकुमार देसले या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. सर्व विद्यार्थी राज्यस्तरीय परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

## पान १ वरुन

**देशात साखर उत्पादनात......**

उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्र प्रथमस्थानी पोहोचला आहे. महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादन ११८ लाख टन असेल. गेल्या हंगामात ते ९३.५१ लाख टन होते. उत्तर प्रदेशचे साखर उत्पादन ९८.५ लाख टन अपेक्षित असून, ते गेल्या हंगामात १०१.१६ लाख टन होते. कर्नाटकचे साखर उत्पादन ६१.०४ लाख टन राहण्याचा अंदाज असून, ते गेल्या हंगामात ५४.८८ लाख टन होते.

**जालना रेल्वे मार्गासाठी......**

मिळणार आहे. उद्योग, शेतीमाल आणि इतर वस्तूंच्या वाहतुकीसाठी हा मार्ग महत्त्वाचा दुवा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या प्रकल्पाकडे विकासाच्या दृष्टीने एक मोठे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. जळगाव तालुक्यातील ८६.६९ हेक्टर क्षेत्र - जळगाव-जालना प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी जळगाव जिल्ह्यातील भूसंपादन प्रक्रियेला आता वेग आला आहे. पहिल्या टप्प्यात जळगाव व जामनेर तालुक्यातील निवडक गावांमधील शेतजमिनी संपादित करण्याची कार्यवाही सुरू झाली असून, महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या पथकांकडून प्रत्यक्ष मोजणीचे काम हाती घेण्यात आले आहे. पैकी जळगाव तालुक्यातील तरसोद, पिंपळे, कुसुंबा, आसोदा, देव्हारी, धानवड, मन्यारखेडा तसेच जळगाव बुद्रुक परिसरातील एकूण सुमारे ८६.६९ हेक्टर शेतजमिनींचे क्षेत्र संपादित केले जाणार आहे. संबंधित सर्व शेतकऱ्यांना अधिसूचनेनुसार पूर्वकल्पना देण्यात आली असून, प्राथमिक टप्प्यात बैठका घेऊन प्रकल्पाचे स्वरूप, संभाव्य लाभ व मोबदला प्रक्रियेची माहिती देण्यात आली होती. सध्या तलाठी, मंडळ अधिकारी व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शेतजमिनींची सीमारेषा निश्चित करून मोजणी केली जात आहे. यामध्ये सातबारा उतारे, नकाशे व प्रत्यक्ष जमिनीची पाहणी यांचा आधार घेतला जात आहे. जामनेर तालुक्यातील १२४.१६ हेक्टर क्षेत्र - जालना रेल्वे मार्गासाठी जामनेर तालुक्यातील मोहाडी, पाळधी, पहूर, सुनसगाव, करमाड, देवपिंप्री आणि पळासखेडा या गावांमधील शेतजमिनींच्या संपादन प्रक्रियेलाही गती देण्यात आली आहे. या तालुक्यात सुमारे १२४.१६ हेक्टर क्षेत्र रेल्वे मार्गासाठी संपादित होणार आहे. जामनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्र येत असल्याने प्रशासनाकडून शेतकऱ्यांशी संवाद साधत टप्प्याटप्प्याने प्रक्रिया राबवली जात आहे. गेल्या वर्षी प्रांताधिकाऱ्यांनी संबंधित गावांच्या हद्दीतील शेतजमिनींच्या संपादनासाठी अधिसूचना जारी केली होती. त्यानुसार प्राथमिक हरकती मागविण्यात आल्या होत्या. काही शेतकऱ्यांनी मोजणी व मोबदल्याबाबत शंका उपस्थित केल्याने अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष बैठका घेऊन त्या स्पष्ट केल्या.

**सुनेत्रा पवार यांची......**

बोलताना पटेल म्हणाले, ज्या प्रकारे एखादा सेनापती सैन्याच्या पुढे उभा राहून नेतृत्व करतो, त्याप्रमाणे अजित पवार सर्व निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचे नेतृत्व करत होते. त्यामुळेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगल्या संख्येने आमदार निवडून आले.

**मालेगावात बनावट......**

कर्जाचा हप्ता भरण्यासाठी अजय राठोड याच्याकडूध ही रक्कम मिळाल्याचे त्याने सांगितले. अजयकडे चौकशी केल्यावर करण राठोड याच्याकडून ही रक्कम मिळाल्याचे त्याने सांगितले. करण याची चौकशी केल्यावर कन्नड येथील बन्सीलाल यादव याने पाचशे रुपयांच्या एक लाख १३ हजाराच्या बनावट नोटा त्याच्याकडे दिल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तपासाचा धागा पुढे नेला असता, कन्नड येथील रेहान खान व समीर खान यांची नावे पुढे आली. समीर यास या नोटा संभाजीनगर येथील गोल्डन कुरेशी याने दिल्याचे निष्पन्न झाले.

**विरोधी पक्ष हा गोंधळलेल्या......**

एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचा रोडमॅप आणि दृष्टिकोन मांडण्यात आला आहे. विरोधी पक्ष तथ्य नसलेल्या आधारे सरकारला लक्ष्य करत आहेत. ते गोंधळलेले आहेत.

**आठवीच्या पुस्तकात न्यायालयातील......**

अस्वस्थता दिसून आली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पाठ्यपुस्तकात न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराशी संबंधित एका प्रकरणाचा समावेश करण्यात आला होता, ज्याची आता सरकारकडून छाननी केली जात आहे. दरम्यान या मजकूरामध्ये सुधारणा केली जाईल किंवा तो काढून टाकला जाईल याबद्दल याबद्दल अधिकृतपणे अद्याप काहीही माहिती देण्यात आलेली नाही.

## मंगल पोत चोरणाऱ्या महिलेस महिलांनीच दिला चोप

प्रतिनिधी । पारोळा

सध्या लग्नसराई सुरू झाली असून प्रत्येक बसस्थानकात प्रवाशांची गर्दी वाढली आहे. नेहमीप्रमाणे याचा फायदा घेत चोरीच्या घटना घडत आहेत. येथील बसस्थानकात मंगलपोत चोरणाऱ्या एका महिलेस रंगेहात पकडल्यानंतर तिला महिलांनी बेदम चोप दिला. परंतु वेळेतच पोलीस दाखल झाल्याने महिला बचावली. दि. २५ रोजी फलाट क्रमांक पारोळा-चाळीसगाव बसमध्ये प्रवाशांनी चढण्यासाठी गर्दी केल्याचे पाहून गर्दीत ललिता समाधान मुंगसे (रा. खडकी ता. चाळीसगाव), मनिषा सुभाष पाटील (रा. नेरपाट ता. अमळनेर) चढत असताना एका ३० ते ३५ वर्षीय महिलेने ललिता मुंगसे यांच्या गळ्यातील मंगल पोत ओढली. याची चाहूल लागताच या महिलेसह उपस्थित महिलांनी या चोरट्या महिलेला बेदम चोप दिला.

## विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत अमळनेरच्या विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी । अमळनेर



**शिरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित नाशिक विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत अमळनेर येथील बॉक्सिंग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदके पटकावली.**

नाशिक विभाग व धुळे जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या स्पर्धेत युवा खेळाडूंनी रिंगमध्ये जिद्दीची ठिणगी पेटवली आणि प्रतिस्पर्ध्यांवर अचूक प्रहार करत आपली छाप उमटवली. यात आदित्य योगेश ठाकूर याने ३० किलो गटात सुवर्णपदक, आदिन्य दीपक संदानशिव याने ३५ किलो गटात सुवर्णपदक, निल दीपक संदानशिव याने २५ किलो गटात रौप्यपदक, तर सार्थक अहिरे याने २८ किलो गटात रौप्यपदक पटकावून नेत्रदीपक यश मिळवले आहे. या सर्व खेळाडूंनी बॉक्सिंग अकॅडमी, अमळनेर येथे कोच भूपेंद्र शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित व शिस्तबद्ध प्रशिक्षण घेतले आहे. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांना हे यश संपादन करता आले, अशी भावना पालक व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली. या यशामुळे अमळनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून या सर्व विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला 'अ' प्लस मानांकन

प्रतिनिधी । नंदुरबार



**राज्य शासनाच्या शालेय गुणवत्ता उन्नती उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या स्कूल कॉलिटी असेसमेंट अँड ॲश्युरन्स फ्रेमवर्क शाळा गुणवत्ता व मूल्यांकन आराखडा अंतर्गत झालेल्या मूल्यमापन प्रक्रियेत एस. ए. मिनिस्ट्रीज ट्रस्ट नंदुरबार संचलित एस. ए. मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला 'अ' प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे.**

राज्यातील १ लाख २ हजार ६७५ शाळांपैकी फक्त १० हजार ६४४ शाळा या मूल्यमापनासाठी पात्र ठरल्या होत्या. त्यापैकी केवळ ४२९ शाळांना 'अ' प्लस श्रेणी मिळाली आहे. त्यात नंदुरबार जिल्ह्यातील एस. ए. मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा समावेश आहे. राज्यातील निवडक शाळांमध्ये या विद्यालयाचा समावेश झाल्याने नंदुरबार जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली असून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रावला आहे. यापूर्वीही शाळेने आयएसओ मानांकन तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन अंतर्गत नाशिक विभागातील प्रथम क्रमांकाची शाळा म्हणून दर्जा प्राप्त केलेला आहे. शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा ही वैयक्तिक आणि संस्थात्मक उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी मानके आणि सर्वोत्तम पद्धतींचा एक संच आहे. त्यामध्ये शिक्षणतज्ज्ञ, नेते, व्यवस्थापन आणि मुलांच्या जीवनात बदल घडवून आणण्यात सहभागी असलेल्या सर्वांसाठी एक साधन आहे. शाळांमध्ये परिवर्तनात्मक बदल घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत व्यापक असण्यासोबतच सर्वोत्तम जागतिक मानकांनुसार मानकीकृत करणे, तसेच मानांकाच्या चौकटीत विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवणे त्याचबरोबर सतत शालेय सुधारणा आणि गुणवत्तापूर्ण कामगिरीवर लक्ष केंद्रित करून आणि शाळांना स्वयं-सुधारणा योजना तयार करण्यास सक्षम हा मुख्य उद्देश आहे. विद्यालयाच्या या यशामागे संस्थेचे अंमलबजावणी योग्य स्व-मूल्यांकन साधन आहे.

शाळांना स्थानिक गरजांमध्ये समृद्ध कार्यकारी संचालक डॉ.राजेश वळवी यांची दूरदृष्टी तसेच प्राचार्य नूतनवर्षा वळवी यांचे सक्षम नेतृत्व, शिक्षक वृंदांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांचा मोठा वाटा आहे. विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, सहशालेय उपक्रम, विद्यार्थी विकास, पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. स्काफ प्रक्रियेअंतर्गत शाळेच्या कार्यप्रणालीचे सखोल मूल्यमापन करण्यात आले.

या प्रक्रियेसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### युवाशक्ती फाउंडेशनतर्फे होणार अनोखा रंगोत्सव

**जळगाव ।** रंगांचा सण असलेल्या धूलिवंदनाचा उत्साह यंदा शहरात विक्रमी स्वरूपात अनुभवायला मिळणार आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या धूलिवंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. युवाशक्ती फाउंडेशनतर्फे आयोजित या कार्यक्रमात कानपूरहून खास मागवण्यात आलेले नैसर्गिक रंग, हवेत रंगांची उधळण करणारे विशेष सिलिंडर्स आणि पारंपरिक ते आधुनिक संगीताचा संगम जळगावकरांना अनुभवायला मिळणार आहे. युवाशक्ती फाउंडेशनतर्फे खान्देश सेंट्रल मॉल येथे मंगळवार, दि.३ मार्च रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ या वेळेत मोफत आयोजन करण्यात आले आहे.

### भुसावळात मानसिक आरोग्य शिबिर

**भुसावळ ।** मध्य रेल्वे कर्मचारी कल्याण निधी, भुसावळ विभागातर्फे येथील कृष्णचंद्र सभागृहात आयोजित एक दिवसीय मानसिक आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले. विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली तसेच अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) सुनील कुमार सुमन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी मध्य रेल्वे मुख्यालयाचे मुख्य कार्मिक अधिकारी (औद्योगिक संबंध) अनुराग मेश्राम उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन आणि समुपदेशन क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेमार्फत रेल्वे कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी तसेच वैयक्तिक आयुष्यात येणाऱ्या तणावांवर मात करण्यासाठी प्रभावी उपाय सांगण्यात आले.

# स्थायी समिती सभापतीसाठी डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला बालकल्याणसाठी सिंधु कोल्हे यांचे अर्ज दाखल

## दोघांचे प्रत्येकी एक अर्ज दाखलमुळे भाजप-शिवसेनेची बिनविरोध निवड निश्चित

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती आणि महिला व बालकल्याण समिती सभापतीपदासाठी गुरुवारी (दि. २६ फेब्रुवारी) अर्ज दाखल करण्यात आले.**

दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने ही निवड आता केवळ औपचारिकता उरली आहे. दोन्ही उमेदवार बिनविरोध निवडून येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थायी समिती सभापतीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. तर महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून शिवसेनेतर्फे ज्येष्ठ नगरसेविका सिंधुताई विजय कोल्हे यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला. दोन्ही उमेदवारांनी आपले अर्ज नगरसचिव सतीश शुक्ला यांच्याकडे सुपूर्द केले. अर्ज दाखल करताना महापालिकेतील राजकीय वातावरण उत्साहाचे होते. यावेळी भाजपतर्फे गटनेता प्रकाश बालानी, उपगटनेता नितीन बरडे, स्थायी समिती सदस्य दीपक सूर्यवंशी, विशाल भोळे, सुरेश सोनवणे, अरविंद देशमुख, कल्पेश सोनवणे, मानसी भोईटे, वंदना इंगळे, नितीन सपके तसेच महिला बालकल्याण समिती सदस्य सुरेखा तायडे, रंजना वानखेडे, पूजा जगताप, विद्या सोनवणे, गायत्री राणे, शिवसेनातर्फे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, दिलीप पोकळे, नरेंद्र पाटील, गणेश सोनवणे तसेच समिती सदस्य प्रतिभाताई देशमुख, डॉ. अमृता सोनवणे यांच्यासह नगरसेवक प्रवीण कोल्हे, पियुष कोल्हे उपस्थित होते.

> स्थायी समितीवर डॉ. चंद्रशेखर पाटील यांची वर्णी लागल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, तर महिला व बालकल्याण समितीचे नेतृत्व अनुभवी सिंधूताई कोल्हे यांच्याकडे गेल्याने शिवसेनेच्या महिला आघाडीत उत्साह दिसून येत आहे. एकमेव अर्ज आल्याने आता केवळ अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.



## शेठ ला.ना.सार्वजनिक विद्यालयात 'हिंद दी चादर' उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शेठ ला. ना. सार्वजनिक विद्यालयात बुधवार दि.२५ फेब्रुवारी, रोजी शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभाग प्रायोजित 'हिंद दी चादर' हा मानवता, शौर्य, धर्मनिष्ठा चे प्रतीक असलेला उपक्रम घेण्यात आला.**



शीख पंथाचे नववे सद्गुरु श्री तेगबहादुरजी यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी गुरु तेग बहादुर यांचे चित्र रंगभरण स्पर्धाही घेण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमासाठी मंचावर हरजीतसिंग बावरी -राष्ट्रीय प्रवक्ता ,आशा संघटना, सुरेंद्रसिंग जोहरी, अॅड. अविनाश खडके, श्रीमती रचना रमणीकसिंग ग्रोवर - रमणीक सिंग ग्रोव्हर, जगजीत सिंग छाब्रा (सचिव, जळगाव गुरुद्वारा ), शाळेचे मुख्याध्यापक सचिन देशपांडे, उपमुख्याध्यापक प्रशांत जगताप, पर्यवेक्षक संजय वानखेडे, पर्यवेक्षिका रमा तारे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सद्गुरु श्री तेगबहादुर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर श्री तेगबहादूर यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. त्यानंतर हरजीत सिंग बावरी यांनी श्री तेगबहादुर यांच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देताना त्यांनी विविध समाजातील लोकांना अन्यायापासून कसे वाचवले आणि आपले बलिदान देऊन समाजापुढे त्यांनी एक आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. तसेच सत्य,मानवता,धर्मनिष्ठा, या गुणांचा परिचय करून दिला. सुरेंद्रसिंग जोहरी आणि अॅड. अविनाश खडके यांनीही आपले विचार याप्रसंगी व्यक्त केले. जळगाव येथील गुरुद्वाराचे सचिव जगजीतसिंग छाब्रा यांनी आपल्या मनोगतातून शिख धर्मियांचे समाजासाठी असणारे योगदान स्पष्ट केले तर रचना रमणीकसिंग ग्रोवर यांनी श्री तेगबहादुर यांच्या ३५० व्या शहीद समागम कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांपुढे मांडला. आपल्या मनोगतातून त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की कोणाला घाबरू नका आणि कोणाला घाबरवू नका. तेगबहादूर यांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय वानखेडे यांनी केले.

## पाळधीत आविष्कार सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव

पाळधी येथील नोबल इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आविष्कार २०२६ उत्साहात पार पडले. चेअरमन डॉ. अर्चना सूर्यवंशी आणि प्रशांत सूर्यवंशी यांच्याहस्ते उपस्थित सर्व मान्यवरांना सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी निलेश पाटील आणि सोशल मीडिया रिलस्टार निकिता पाटील यांची उपस्थिती लाभली. जळगाव महापालिकेच्या महापौर दीपमाला काळे, माजी महापौर जयश्री महाजन, उपमहापौर मनोज चौधरी, धरणगावच्या नगराध्यक्षा लीलाताई चौधरी आणि एरंडोलचे नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## जळगावात भरदिवसा सोनसाखळी लांबवली; दुचाकीस्वार चोरट्यांचा थरार

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. चालत्या दुचाकीवरून एका महिलेच्या गळ्यातील सोन्या-चांदीची साखळी हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



फिर्यादी सीमा हसमुख सूर्यवंशी (वय ४३, रा. देवेंद्र नगर, जळगाव) या २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ .३० वाजेच्या सुमारास आपल्या 'प्लेझर' दुचाकीने आनंद नगर येथील घरी जात होत्या. त्या मोहन नगर भागातील हिरकणी डेअरी जवळून संभाजी नगर स्टॉपकडे जाणाऱ्या रोडवर असताना, पाठीमागून एका दुचाकीवर दोन अज्ञात इसम आले. दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने चालत्या गाडीवरून मोठ्या शिताफीने सूर्यवंशी यांच्या गळ्यातील दागिने हिसकावले. यात एकूण ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

याबाबत पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रारदाराच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## युवा क्रांती संघटनेच्या निवेदनानंतर बसफेऱ्या सुरू!

- अक्कलकुवा आगार व्यवस्थापकांचा सकारात्मक प्रतिसाद

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**प्रशासकीय समन्वय आणि जनशक्तीची ताकद काय असते, याचा प्रत्यय आज अक्कलकुवा येथे आला. युवा क्रांती नंदुरबार सामाजिक संघटना यांच्या निवेदनानंतर अक्कलकुवा-जमाना- धडगाव मार्गावरील बंद असलेल्या बसफेऱ्या अवघ्या ३० मिनिटांत पुन्हा सुरू करण्यात आल्या.**



गेल्या काही दिवसांपासून सकाळी ९:३० वाजता अक्कलकुवा-धडगाव तसेच दुपारी ३ वाजता जमाना- असली या फेऱ्या तांत्रिक कारणास्तव बंद होत्या. परिणामी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते, तसेच कामगार व सर्वसामान्य नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत होता. या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज आगार व्यवस्थापकांची प्रत्यक्ष भेट घेत निवेदन सादर केले. आगार व्यवस्थापकांनी निवेदनाची तात्काळ दखल घेत संबंधित विभागाशी समन्वय साधून तांत्रिक अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले. प्रशासनाच्या सकारात्मक व सहकार्याच्या भूमिकेमुळे केवळ अर्ध्या तासात बस फेऱ्या पुन्हा मार्गस्थ करण्यात आल्या. यामुळे प्रवासी, विद्यार्थी व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवेदन देताना प्रदेश सरचिटणीस अॅड. दीपक वसावे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. पंकज तडवी, महेश पाडवी व इतर पदाधिकारी उपस्थित होते. 'प्रशासनाने सकारात्मक समन्वय ठेवला आणि सहकार्याची भूमिका घेतली, तर प्रश्न सुटायला वेळ लागत नाही.

## रोटरी इलाईटमुळे विद्यार्थ्यांचे विमान प्रवासाचे स्वप्ने होणार साकार : संदीप झंवर

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील १५ गुणवंत विद्यार्थ्यांची हैदराबाद दर्शनासह परतीची विमान प्रवासाची स्वप्ने आता प्रत्यक्षात साकार होत असल्याचे रोटरी क्लब ऑफ जळगाव इलाईटचे अध्यक्ष संदीप झंवर यांनी सांगितले.**



रोटरी क्लब ऑफ जळगाव इलाईटतर्फे दरवर्षी 'सपने सच हुए' हा उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत शहरातील पाच शाळांमधील इयत्ता आठवीतील १० गुणवंत विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेतली जाते. त्यानंतर मुलाखतीद्वारे १५ विद्यार्थ्यांची हैदराबाद शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात येते, अशी माहिती त्यांनी दिली. यावर्षी गुळवे मुलींचे विद्यालयातील कीर्तीका पवार, रोशनी पवार, गार्गी साबळे; या.दे. पाटील विद्यालयातील दिशा सूर्यवंशी, यामिनी नारखेडे, तुषार महाले; कुमुदिनी इंगळे विद्यालयातील जयेश बाविस्कर, गुंजन राठोड, वैष्णवी मिसर; तसेच खूबचंद सागरमल हायस्कूलमधील आनंदी ढोक, प्रज्ञा साळवे, दिया वाघ आणि शारदा माध्यमिक विद्यालयातील अंजली तांबारे, जागृती चव्हाण, तनिष्का पवार अशा एकूण १३ विद्यार्थिनी व २ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती प्रकल्प प्रमुख डॉ. वैजयंती पाध्ये यांनी दिली. या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थी हैदराबाद व परिसरातील ऐतिहासिक, प्रेक्षणीय आणि धार्मिक स्थळांना भेट देणार आहेत.

### १५ विद्यार्थी हैदराबाद दौऱ्यासाठी रवाना

विशेष म्हणजे परतीचा हैदराबाद-जळगाव प्रवास विमानाने होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. बुधवार, दि. २५ रोजी दुपारी 'हिसार-हैदराबाद एक्सप्रेस'ने विद्यार्थी व रोटरी इलाईटचे पदाधिकारी हैदराबादकडे रवाना झाले. यावेळी लक्ष्मीकांत मणियार, राजीव बियाणी, नितीन इंगळे, ओमप्रकाश सिंग, अजित महाजन, संजय तापडिया, सुरेश मंत्री, ज्ञानेश्वर महाडिक, विद्याधर नेमाने, मीत मेहता, डॉ. अशोक पाध्ये, प्रीतम लाठी, किरण झंवर, चारू इंगळे, माधुरी महाजन, रुची मणियार, मनीषा खडके आदी मान्यवरांसह शिक्षक उपस्थित होते.

# देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिवल उद्यापासून रंगणार

## अभिनेते मनोज जोशी हे देवगिरी चित्रतपस्वी तर आरोह वेलणकर, सुरभी हांडे देवगिरी चित्रगौरव पुरस्काराचे मानकरी

प्रतिनिधी । जळगाव

**अजिंठा फिल्म सोसायटी आणि कान्ह ललित कला केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५ वा आंतरराष्ट्रीय देवगिरी शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी जळगाव येथील कान्ह ललित कला केंद्र, एम.जे. कॉलेज परिसरात संपन्न होत आहे. महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असून उत्साह शिगेला पोहोचला आहे.**

चित्रपट विषयक प्रदर्शनी, शॉर्ट फिल्म स्क्रिनिंग, मास्टर क्लास, चर्चासत्र, ओपन फोरम, टुरिंग टॉकीज तसेच रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमांसह उद्घाटन व समारोप सोहळा अशा विविध उपक्रमांनी हा महोत्सव रंगणार आहे. यंदा पाचव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या महोत्सवात देशातील २० राज्यांमधून तसेच विदेशातून शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, कॅम्पस फिल्म व बाल फिल्म सहभागी झाल्या आहेत. तज्ज्ञ परीक्षकांच्या परीक्षणानंतर निवडक ८० चित्रपटांचे अधिकृत प्रदर्शन दोन दिवसांत करण्यात येणार आहे. देशभरातील सुमारे ३०० युवा फिल्ममेकर यानिमित्ताने जळगावात येत असून रसिकांना दर्जेदार लघुपट व माहितीपटांची मेजवानी मिळणार आहे.




महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण परिसराला ङ्गदादासाहेब फाळके चित्रनगरीफ असे नामकरण करण्यात आले असून स्क्रिनिंग सभागृहांना अभिनेते धर्मेंद्र, अभिनेत्री संध्या व अभिनेत्री प्रिया मराठे यांची नावे देण्यात आली आहेत. दि. २८ रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन व स्क्रिनिंगने महोत्सवाची सुरुवात होईल. दुपारी ११.३० ते १२.३० या वेळेत ङ्गचित्रपट आणि समाज जागरणफ या विषयावर ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक अभिजित गोखले यांचा मास्टर क्लास होणार आहे. दुपारी ३ ते ४ या सत्रात ङ्गरंगभूमी ते चित्रपटसृष्टी - एक प्रवास या विषयावर अभिनेते मनोज जोशी मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी ५ वाजता वंदे मातरम् मुख्य सभागृहात महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य उद्घाटन सोहळा पार पडेल. शोमॅन राज कपूर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष कार्यक्रम सादर करण्यात येईल.

यावेळी मनोज जोशी यांना ङ्गदेवगिरी चित्रतपस्वीफ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता टुरिंग टॉकीज सत्रात दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ङ्गसंत ज्ञानेश्वरांची मुक्ताईफ हा चित्रपट बास्केटबॉल मैदानावर प्रदर्शित केला जाणार असून दिग्दर्शक रसिकांशी संवाद साधणार आहेत. दि. १ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून तिन्ही सभागृहांत चित्रपट प्रदर्शन होईल.

सकाळी ११ वाजता ङ्गदिग्दर्शकाच्या नजरेतून छत्रपती शिवरायफया विषयावर दिग्पाल लांजेकर यांची प्रकट मुलाखत होईल. दुपारी १ वाजता अभिनेते योगेश सोमण व दिग्दर्शक अतुल गंगवार ङ्गचित्रपट निर्मिती प्रक्रिया - आव्हाने आणि संधीफया विषयावर मास्टर क्लास घेतील. दुपारी ३ वाजता ओपन फोरम सत्रात योफिमा शिष्यवृत्ती विजेते युवा चित्रकर्मी, अभिनेते आरोह वेलणकर व अभिनेत्री सुरभी हांडे युवकांशी संवाद साधतील. सायंकाळी ५ वाजता समारोप सोहळा पार पडेल. यावेळी दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार असून ङ्गदेवगिरी चित्रगौरवफ पुरस्कार आरोह वेलणकर व सुरभी हांडे यांना प्रदान करण्यात येईल. तसेच सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्म, कॅम्पस फिल्म व माहितीपटांना पारितोषिके वितरित केली जातील.

## विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क या विषयावर चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क विभागामार्फत पारंपरिक ज्ञान संवर्धन आणि नवसंशोधनासाठी बौद्धिक संपदा हक्क या विषयावर २६ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले.**

यावेळी मंचावर भौगोलिक मानांकन क्षेत्रातील तज्ज्ञ ड. गणेश हिंगमिरे (पुणे), लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक), बौध्दीक संपदा हक्क केंद्राचे प्राध्यापक डॉ. डी.जी. हुंडीवाले, रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.दीपक दलाल, समन्वयक प्रा.विकास गीते उपस्थित होते. डॉ.गणेश हिंगमिरे (पुणे) यांनी सांगितले की, जळगावची केळी, जळगावचे भरीत वांगे आणि नवापूर तूरडाळ या खान्देशातील तीन उत्पादनांना बौध्दीक संपदेच्या माध्यमातून भारतात वेगवेगळ्या राज्यात प्रसिध्दी मिळू शकते. येथील उद्योगधद्यांना प्रोत्साहन मिळू शकते. तसेच आपल्या भागातील शेतकऱ्यांना या पारंपरिक व्यवसायातून समृध्द करता येईल हे महत्वाचे आहे. उत्पादनांना जर भौगोलिक मानांकन प्राप्त होऊ शकले तर त्याद्वारे उत्पादकांना मोठ्याप्रमाणावर आर्थिक फायदा होऊ शकतो.

# निम्न तापी पाडळसे प्रकल्पाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव द्या!

## • आ.अनिल पाटील यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

प्रतिनिधी । अमळनेर

**निम्न तापी प्रकल्प पाडळसे (ता. अमळनेर) या प्रकल्पाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे. याबाबतचे विनंती पत्र माजी मंत्री तथा आ. अनिल भाईदास पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच जलसंपदामंत्री यांना दिले आहे.**



सदर पत्रात म्हटले आहे की, निम्न तापी प्रकल्प पाडळसे, हा तापी नदीवरील अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर अमळनेर, पारोळा, चोपडा, धरणगाव तसेच धुळे जिल्ह्यातील शिरपूर व शिंदखेडा या तालुक्यातील ४३ हजार ६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच १७.१ टी.एम.सी.पाणी अडविण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाने शेती व पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न सुटणार आहे. आ.अनिल पाटील यांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विनंती पत्र तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी सुध्दा पाणी राखीव असल्याचे नियोजन आहे.

एवढा मोठा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पाठपुराव्याने मंत्रीमंडळ बैठकीत डिसेंबर, २०२४ मध्ये ४ हजार ८९० कोटी रुपये एवढी चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता राज्य शासनाने दिली. त्यानंतर शासनाने प्रकल्प केंद्रीय जलआयोग यांच्याकडे प्रकल्प मान्यतेसाठी पाठविण्यात आला. त्यानंतर प्रकल्प केंद्रीय जलआयोगने इतर संबंधित विभागाच्या वैधानिक मान्यता प्राप्त झाल्या त्यात महत्वाचे म्हणजे राज्याचा हिस्सा देण्याची हमी अजितदादा पवार यांच्या मार्फत राज्य वित्त आयोग यांनी दिल्यानंतर सीडब्ल्यूसीने शिफारस करुन केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे प्रकल्प पाठविण्यात आला.

**केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने विशेष अधिकार समितीची मान्यता घेऊन प्रकल्पाला प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समाविष्ट करण्यात आला. या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे जलपूजन अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्याचे नियोजन केले होते. परंतु त्यांच्या पाठपुराव्याने हा प्रकल्प पूर्णत्वाकडे वाटचाल करीत आहे. आज दुर्दैवाने ते आपल्यात नसल्याने या प्रकल्पाला अजितदादा पवार निम्न तापी प्रकल्प पाडळसे अशा नावास मान्यता द्यावी, अशी विनंती आ. अनिल पाटील यांनी केली आहे.**

## थोडक्यात

### बांबरुड राणीचे येथील मराठी शाळेत स्नेहसंमेलन

**पाचोरा ।** तालुक्यातील बांबरूड राणीचे येथील जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्लिश स्कूल तथा मराठी शाळेत जल्लोष चिमुरड्यांचा अविष्कार कलागुणांचा या उक्तीप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी दि. २७ रोजी सायंकाळी ६ वाजता सेमी इंग्लिश स्कूल प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ स्नेहसंगम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### ऐनपूर येथे मातृभाषा दिन साजरा

**रावेर ।** सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे जागतिक मातृभाषा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा डॉ रेखा पाटील या होत्या. प्रमुख वक्ते प्रा डॉ महेंद्र सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात मातृभाषा दिनाचे सार्वभौम महत्व समजुन सांगितले. १९९९ ला युनेस्कोने २१ फेब्रुवारी रोजी मातृभाषा दिन साजरा करावा असे ठरवले.

## धरणगावातील मो.रईस मो.ईब्राहिम यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । धरणगाव

**महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेतर्फे देण्यात येणारा तात्यासाहेब ज्योतिबा फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक–२०२६ पुरस्कार धरणगावातील रहिवासी व जिल्हा परिषद उच्च प्राथ.उर्दू कन्या शाळा धरणगावचे उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेले मोहम्मद रईस मोहम्मद इब्राहिम यांना प्रदान करण्यात आला.**



विशेष म्हणजे संपूर्ण राज्यातून अवघ्या सहा शिक्षकांची निवड पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. त्यामध्ये धरणगावातील रईस सरांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील अल्पबचत भवन जळगाव येथे झालेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. उत्तम कांबळे, शिक्षक आमदार किशोर दराडे, समता शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डी. के. अहिरे, प्रदेशाध्यक्ष प्रा. भरत शिरसाट यांच्यासह अनेक शासकीय अधिकारी, साहित्यिक व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रा.भरत शिरसाट यांनी प्रास्ताविक करताना म्हटले की,मोहम्मद रईस मोहम्मद इब्राहिम सरांनी राबवलेल्या शैक्षणिक नवोपक्रमांची माहिती देत त्यांच्या विद्यार्थीहितैषी व उपक्रमशील कार्याचा गौरव केला. सूत्रसंचालन म.रा.स.शि.प. जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब सोनवणे यांनी केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी प्रकाश तामस्वरे यांच्यासह इतर सहकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत जाधव, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून रईस सरांचे अभिनंदन होत आहे.

## लासूर येथे श्री संत तुकाराम महाराज बीजनिमित्त कीर्तन सप्ताह

प्रतिनिधी । लासूर

**येथे सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील जगतगुरु संत श्री तुकाराम महाराज बीजनिमित्त अखंड ज्योत कीर्तनी सप्ताहाचे आयोजन दि.२६ फेब्रुवारीपासून करण्यात आले आहे. यात आठ दिवस नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे.**

दररोज सकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत काकड आरती तसेच सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत हरिपाठ होणार आहे. दररोज रात्री ८.३० ते १०.३० कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२६ फेब्रुवारी रोजी ह.भ प.वैष्णवीताई महाराज कान्हेरी गवळी(अकोला), दि.२७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.पांडूरंग महाराज मालपूरकर,दि.२८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.खुशाल महाराज म्हाळसे पिंपळगाव, दि.१ मार्च रोजी ह.भ.प.गोविंद महाराज कुरंगीकर,दि.२ मार्च रोजी ह.भ.प.सुशिल महाराज विटनेरकर,दि. मार्च रोजी ह.भ.प.इंद्रायणी महाराज मालेगाव,दि.४ मार्च रोजी ह.भ.प.गजानन महाराज चौगावकर यांचे कीर्तन होणार आहे. दि. ५ मार्च रोजी ह.भ.प.भगवान महाराज मालपूरकर यांच्या काल्याचा कीर्तनाने सप्ताहाचा समारोप होणार आहे. कीर्तन सप्ताहाला येथील श्रीराम भजनी मंडळाचे सहकार्य लाभले. लासूर व परिसरातील भाविक बंधू–भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज बिजोत्सव व मराठा समाज बांधव लासूर यांनी केले आहे.

## बापू वराळे यांना पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील सुपुत्र बापू जगन्नाथ वराळे यांची शासन निर्देशानुसार पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती करण्यात आली आहे. ही पदोन्नती जिल्हा पोलीस दलात गौरवाचा क्षण ठरली आहे.**



पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते त्यांना पदचिन्ह प्रदान करण्यात आले. बापू वराळे यांनी पोलीस दलात कार्यरत असताना कर्तव्यदक्षता, शिस्तबद्धता आणि कायदा सुव्यवस्था राखण्याच्या कामात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. कठोर परिश्रम, चिकाटी आणि निष्ठेच्या जोरावर त्यांनी ही पदोन्नती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे धरणगाव शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण आहे. शेतकरी कुटुंबातील साध्या पार्श्वभूमीतून पुढे येत त्यांनी पोलीस सेवेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सेवाकाळात त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडत वरिष्ठांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या या प्रगतीमुळे युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. पदोन्नतीनंतर बापू वराळे यांची नेमणूक जिविशा येथे करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक बापू वराळे यांच्या पदोन्नतीमुळे धरणगावच्या नावलौकिकात भर पडली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## चोपड्यात सावकाराच्या जाचाला कंटाळून युवकाचा गळफास

### मयताच्या खिश्यात चिठ्ठी आढळून आल्याने खळबळ

प्रतिनिधी । चोपडा



शहरातील लोहिया नगर भागातील २५ वर्षे युवकाने सावकाराच्या जाचाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. मृताच्या खिशात सुसाईड नोट सापडल्याने घटनेचे गुढ वाढले आहे. शहरातील लोहिया नगरमधील रहिवासी असलेल्या योगेश सुनील चौधरी (वय २५) या युवकाने सावकाराच्या जाचाला कंटाळून आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

खिश्यात आढळलेल्या सुसाईट नोटवरून सावकाराने पैशांचा तगादा लावल्यामुळे कंटाळून गळफास घेतल्याचे चिठ्ठीत नमुद केले आहे. त्यात पिंटू नामक व्यक्ती पैशांसाठी सतत तगादा लावत असल्याने मी आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. सदरील व्यक्तीकडून १० हजार रुपये घेतले होते. त्या पोटी त्याने दोन लाख रुपये व्याज पिंटूला दिले आहे. तरी तो पैशांसाठी तगादा लावत होता. सावकाराने मृत योगेशला पैशांसाठी धमकी देऊन मारहाण केली होती. तसेच त्याच्या आई, वडिलांनाही शिवीगाळ केली होती. या सर्व गोष्टींना कंटाळून आत्महत्या करत असल्याचा उल्लेख योगेशने चिठ्ठीमध्ये केला आहे. पिंटू या व्यक्तीला पोलिसांनी कडक शिक्षा करावी, अशी विनंतीही त्याने सुसाईट नोटमध्ये केली आहे.

**● योगेशचे कुटुंब अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आपला उदरनिर्वाह करीत आहे. मृत योगेश चौधरी याच्या पश्चात आई, वडील, असा परिवार आहे. मृत योगेश हा हातमजुरी करत होता, अशी माहिती परिसरातील मित्र मंडळी व नातेवाईकांनी दिली. दरम्यान या घटनेची शहर पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. पोलिस निरिक्षक मधुकर साळवे यांनी मृताच्या खिशात चिठ्ठी आढळून आली असून पैशांचा उल्लेख असल्याच्या वृत्तास दुजोरा दिला आहे.**

## राज्यस्तरीय युवा परिषदेत अमळनेरची कीर्ती सोनवणे सहभागी

प्रतिनिधी । अमळनेर

**मुंबई विद्यापीठात ‘रस्ते सुरक्षा’ या विषयावर आयोजित राज्यस्तरीय युवा परिषदेत अमळनेर येथील समाजकार्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी कीर्ती समाधान सोनवणे हिने सहभाग नोंदविला आहे.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटीच्या समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर यांच्या वतीने कीर्ती सोनवणे हिची निवड करण्यात आली आहे. ही परिषद राज्यातील सर्व विद्यापीठांतील निवडक स्वयंसेवकांसाठी आयोजित करण्यात आली असून, रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती, युवकांची भूमिका आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना या विषयांवर मार्गदर्शन व चर्चासत्रे पार पडत आहेत. या परिषदेसाठी कीर्ती सोनवणे हिला संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे, जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजू गवारे तसेच विभागीय समन्वयक प्रा. डॉ. दिलीप गिऱ्हे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या उल्लेखनीय सहभागाबद्दल संस्था अध्यक्ष अभिजीत भांडारकर, प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. विजयकुमार वाघमारे, डॉ. अनिता खेडकर, विभागप्रमुख डॉ. जगदीश सोनवणे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

## डॉ. योगिता शिंदे यांची एम.एस. (नेत्ररोग) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड

प्रतिनिधी । अमळनेर

येथील सुपुत्री डॉ. योगिता अशोक शिंदे यांची एम.एस. (नेत्ररोग) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कै. अशोक अजबसिंग शिंदे (माजी बुकिंग क्लार्क, रेल्वे, अमळनेर) यांची कन्या आहे. डॉ. योगिता शिंदे या जिल्हा रुग्णालय, धुळे येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. दिल्ली येथील काऊन्सेलिंग प्रक्रियेद्वारे त्यांनी ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी संपादन केली असून हे यश त्यांच्या अअथक परिश्रम, संयम आणि दृढ इच्छाशक्तीचे फलित आहे. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी वडिलांचे स्वप्न साकार करत आई–वडील, भाऊ, वहिनी, कुटुंब, गाव व समाजाचे मस्तक अभिमानाने उंचावले आहे. त्यांचे हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## आरपीआय (आठवले गट) चे अशोक बोरेकर यांचा कार्यकर्त्यांसह रिपब्लिकन सेनेत प्रवेश

### माजी विधानसभा अध्यक्ष बोरेकर यांची जिल्हा उपाध्यक्षपदी वर्णी

प्रतिनिधी । भुसावळ

**रिपब्लिकन चळवळीत आपली आक्रमक आणि वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या रिपब्लिकन सेनेची ताकद जळगाव जिल्ह्यात दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. याच पार्श्वभूमीवर आज, बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भुसावळ येथील शामा प्रसाद मुखर्जी गार्डन मध्ये आरपीआय (आठवले गट) चे माजी रावेर–यावल विधानसभा अध्यक्ष अशोक बोरेकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह रिपब्लिकन सेनेत जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे यांच्या हस्ते अशोक बोरेकर व त्यांच्या कार्यकर्त्यांना रिपब्लिकन सेनेचे उपरणे घालून पक्षात अधिकृतरीत्या प्रवेश देण्यात आला.**



पक्षप्रवेश होताच अशोक बोरेकर यांच्या अनुभवाची दखल घेत त्यांची रिपब्लिकन सेनेच्या मजिल्हा उपाध्यक्षफ पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे म्हणाले की, अशोक बोरेकर यांच्याकडे दांडगा जनसंपर्क असून त्यांच्या येण्याने रावेर–यावल विधानसभा क्षेत्रात पक्षाला मोठी उभारी मिळाली आहे. रिपब्लिकन सेना वंचितांच्या प्रश्नांवरचा सर्वात मोठा दबावगट म्हणून काम करेल. येणाऱ्या काळात रावेर–यावलमधील प्रत्येक प्रश्नावर आम्ही आक्रमक लढा देऊ. अशोक बोरेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचे कणखर नेतृत्व, प्रगल्भ विचारधारा आणि जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे यांचे कार्य पाहून मी हा निर्णय घेतला आहे.

याप्रसंगी जिल्हा नेते दिनेश इखारे, जिल्हा महासचिव अरुण तायडे, जिल्हा उपाध्यक्ष देवदत्त मकासरे मेजर, राजेंद्र बारी, खढ सेल प्रमुख स्वप्नील सोनवणे, बंटी नरवाडे, भुसावळ शहराध्यक्ष लिलाधर सपकाळे, रमेश खंडारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्याम उपदेशी मंडळाचे कार्यकर्ते रिद्धपूर यात्रेसाठी रवाना




प्रतिनिधी । गणपूर ता.चोपडा

**येथील श्याम उपदेशी मंडळाचे कार्यकर्ते व महानुभाव पंथीय उपदेशी बांधव नुकतेच पदयात्रेने रिद्धपूर येथील यात्रेसाठी रवाना झाले.**

येथील उपदेशी बांधव दरवर्षी विविध स्थळांसाठी पदयात्रा करत असतात.यावेळी त्यांना येथील दत्त मंदिरातून उपदेशी बांधवांनी निरोपासह शुभेच्छा दिल्या. या पदयात्रेत १९ भाविक सहभागी झाले आहेत. ते ५ मार्च रोजी रिद्धपूर येथे पोहोचणार आहेत. १२ ते १४ दिवस पदयात्रा करत पोहचतील. या पदयात्रेत बापूराव पाटील, विलास पाटील, बाबूलाल भावसार, संजय पाटील, वाल्मीक पाटील, गणेश पाटील, सोनू पाटलासह मंडळाचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.